ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

टेलि. ५५६२७

दुर्गाधिवास, पुणें ४

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53

वर्ष ३१ | पुणें, बुधवार १ सप्टेंबर, १९६५ | अंक १७

SCO-1 HIN

## नहीं—
## यह कोई
## साधारण कार्य नहीं!

# सरदार
## सोडा वाटर
## यंत्रसामग्री

यह यंत्रसामग्री ६० वर्ष पहिले प्रस्तुत की गयी है और आजभी इसकी कोई तुलना नहीं। भारत और पूरबी देशों में हजारों की संख्या में ये यंत्र उपयोगमें हैं और सैनिकी भोजनशाला, क्लब, अस्पताल, उपाहारगृह और खाद्यालय आदि में ये कितने ही यंत्र गत २० वर्षोंसे काम देते आये हैं।

हर दिन ५० से ४०० दर्जनों तक शीतल पेयों की बोतलें निर्माण करनेवाले इन यंत्रों की कीमत का थोडे ही काल में कई गुना मुबदला मिल जाता है।

हमारे दूसरे निर्माण हैं: १. रंगहीन द्रव कार्बन डायआक्साईड वायु जो कार्बोनेशन में तथा आग बुझाने में उपयोगी है, २. सोडा वाटर यंत्रों के कलपुर्जे, ३. सूखा बरफ

**यंत्रों और कलपुर्जोंकी नकल से सावधान रहिये**



नवल सोडा वाटर यंत्र — घरेलू सोडा वाटर यंत्र

## दि सरदार कार्बोनिक गैस कंपनी लिमिटेड

सर विठ्ठलदास चेम्बर्स, १६, अपोलो स्ट्रीट, बम्बई १.

फोन: कार्यालय: २५३३७१ कारखाना: ७६१०२

# विविध माहिती

**दंतवैद्यांचें संशोधन**—इजिप्तमध्यें बांधण्यांत येत असलेल्या आस्वान धरणामुळें इजिप्शिअन संस्कृतीचे कांहीं प्राचीन अवशेष पाण्यांत बुडणार होते. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या साह्यानें आतां ते वाचविण्यांत येत आहेत. तथापि पाण्याखालीं जाणाऱ्या कांहीं प्राचीन थडग्यांचें अलीकडे नव्यानें संशोधन करण्यांत येत आहे. ह्या थडग्यांतील माणसांच्या हजारों कवट्यांचा अभ्यास करण्यांत येत आहे. ४,००० वर्षांपूर्वीच्या ह्या कवट्यांचा अभ्यास करून माणसाच्या दंतपंक्तीच्या रचनेंत कांहीं बदल झाला असल्यास तो अभ्यासण्यांत येणार आहे.

**कापड गिरण्यांवर बोजा**—कामगारांना द्यावयाच्या महागाई भत्त्याबद्दल सुप्रीम कोर्टानें दिलेल्या एका निवाड्यामुळें अहमदाबादमधील कापड गिरण्यांना १·५० कोटी रुपये जादा द्यावे लागणार आहेत. १९६४ च्या मार्चपासून १९६५ च्या एप्रिलपर्यंतच्या काळांतील महागाईभत्ता म्हणून प्रत्येक कापड-गिरणी कामगाराला मागील बाकीच्या पोटीं ११२ रुपये मिळणार आहेत. अहमदाबादमधील कापड गिरण्यांनीं १९६५ च्या एप्रिलपासून राहणीच्या नव्या निर्देशांकाप्रमाणें महागाईभत्ता देण्यास आरंभ केला आहे.

**देवालयाचा प्रसाद आरोग्याला घातक**—जगन्नाथपुरी येथील देवळांत देवाचा प्रसाद म्हणून भाविकांना वांटण्यांत येणारें अन्न आरोग्याला घातक असतें, असें राष्ट्रीय आहार सल्लागार कमिटीला आढळून आलें आहे. ज्या भांड्यांत भात आणि डाळ शिजविण्यांत आलीं होतीं तीं भांडीं गलिच्छ होतीं. त्याचप्रमाणें देवापुढें ठेवण्यांत येणाऱ्या गोडधोड पदार्थांवर माशांचे थवे बसलेले होते. अशा अस्वच्छ रीतीने देण्यांत येणारा प्रसाद संसर्गजन्य रोगांच्या प्रसाराला नामी संधि देणारा ठरतो असें कमिटीनें म्हटलें आहे.

**राजस्थांनमधील सहकारी संस्था**—राजस्थांनमधील खादी आणि ग्रामोद्योग संघाच्या सहकारी संघटनांना मध्यवर्ती सरकारकडून २९ लाख रुपयांचें कर्ज आणि ९·७२ लाख रुपयांची मदत गेल्या आर्थिक वर्षांत देण्यात आली. त्याशिवाय राज्य सरकारकडूनहि १·९३ लाख रुपये मदत देण्यांत आली. ह्या सहकारी संस्थांत तेलाच्या घाण्या, कातडीं कमावणाऱ्या संस्था, मध गोळा करणाऱ्या संघटना, हातसडीचा तांदूळ करणाऱ्या संघटना, ताडगुळाच्या संस्था, इत्यादींचा समावेश आहे.

**हलक्या रणगाड्यांचें उत्पादन**—आवडी येथें स्थापन करण्यांत आलेल्या रणगाड्यांच्या कारखान्यांत हलक्या वजनाचे रणगाडे तयार करण्याचा निर्णय घेण्यांत आला आहे. हा कारखाना मूळचा मध्यम आकाराच्या रणगाड्यासाठी स्थापन केलेला आहे. पण संरक्षणविषयक गरजा भागविण्यासाठी निर्णय बदलण्यांत आला आहे. हे रणगाडे मुख्यत: उंच विभागांतील युद्धांत वापरण्यांत येतात. त्यांचें वजन रशिआंतून आणलेल्या रणगाड्यांपेक्षा कमी असेल.

**पुस्तकांच्या दुष्काळाची भीति**—मुंबईतील नागरिकांनी मिळेल तेथून पुस्तकें विकत घेण्याचा सपाटा चालविला आहे. पूर्वीप्रमाणें पुस्तकें हवीं तितकीं मिळणार नाहींत अशी भीति त्यांना वाटत आहे. खरेदीची लाट उसळल्यामुळें पुस्तकांच्या दुकानांची विक्री २५ टक्क्यांनीं वाढली आहे. ह्या वर्षी सुमारें १ कोटी रुपयांचीं पुस्तकें आयात करण्यांत येतील. गेल्या वर्षी ३ कोटी रुपयांचीं पुस्तकें आयात करण्यांत आलीं होतीं.

**रशियाची पाकिस्तानला मदत**—पाकिस्तानच्या पाणी-पुरवठा व वीज उत्पादन मंडळाचे अध्यक्ष मि. गुलाम इशाक नुकतेंच रशियाला भेट देऊन आले. परत आल्यावर त्यांनीं अशी माहिती सांगितली, कीं पाकिस्तानच्या तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाला आर्थिक मदत देण्याची तयारी रशियाने दाखविली आहे. मदतीसंबंधींचा तपशील ठरविण्यांत येत आहे. विजेचें उत्पादन व दळणवळण ह्या कामीं पाकिस्तानला रशियाची मदत विशेषेंकरून हवी आहे.

**बरौनी येथें खताचा कारखाना**—बरौनी येथील तेल-शुद्धीच्या कारखान्यालगत रासायनिक खतांचा कारखाना काढण्याचा विचार करण्यांत येत आहे. तो उभारण्यासाठी रशियानें मदत देण्याची तयारी दाखविली आहे. बरौनी येथील तेलाशुद्धि कारखान्याच्या आसपास पेट्रोलजन्य पदार्थ तयार करण्याचे अनेक कारखाने निघूं शकतील आणि ह्या भागाची भरभराट होऊं लागेल.

**पोलादाच्या निर्यातीचें उद्दिष्ट**—चालू वर्षी भारतामधून ३ लाख टन पोलाद निर्यात करण्याचें उद्दिष्ट ठरविण्यांत आलें आहे. संकल्पित निर्यातीमुळें १२ कोटी रुपयांच्या परदेशीय चलनाची प्राप्ती होईल. गेल्या वर्षी भारतानें १ लाख टन पोलादाची निर्यात केली होती. असें असलें तरी कांहीं विशिष्ट प्रकारचें पोलाद आयात करावें लागणार आहे. चौथ्या कार्य-क्रमांतील पोलादाच्या निर्मितीचें उद्दिष्ट १·६५ कोटी टनाचें आहे.

*INTRODUCING!*

**The Belgaum Bank Ltd.**

**( Sch. Bank : Estd. 1930 ; Regd. Office, Belgaum )**

have pleasure in announcing the introduction of new series of

*CUMULATIVE DEPOSITS*

**Salient features of the new series**

* The levy of incidental charges abolished.
** Interest at 4% is allowed on the deposits paid before maturity.
*** Amount of penal interest on late payments reduced.
**** Attractive and higher rates of interest allowed.

**We invite you to join our new Cumulative Deposit Scheme.**

**Please contact any of our 38 offices in Mysore, Maharashtra and Goa.**

Rs. *Five* deposited *every month* for *five years* will bring you Rs. *345-75* at the end of *five years.*

# अर्थ

बुधवार, १ सप्टेंबर, १९६५





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## भारताच्या मालाला अमेरिकेंत भरपूर वाव

भारतामध्यें तयार होणाऱ्या पक्क्या व अर्धपक्क्या मालाला अमेरिकेच्या बाजारपेठेंत चांगला वाव मिळूं शकेल अशी माहिती मध्यवर्ती सरकारच्या व्यापारखात्यानें एका पत्रकांत प्रसिद्ध केली आहे. हें पत्रक बोर्ड ऑफ ट्रेडकडे पाठविण्यांत आलें आहे. निर्यात वाढविण्याच्या ह्या संबंधीचा फायदा घेण्यास पत्रकांत सुचविण्यांत आलें आहे. १९६४–६५ सालीं भारतानें अमेरिकेला १५१·१० कोटी रुपये किमतीचा माल निर्यात केला. त्यापूर्वीच्या वर्षातील निर्यात मालाच्या किमतीचा आकडा १२९ कोटी रुपयांचा आहे. गेल्या पांच वर्षांत भारताच्या अमेरिकेला होणाऱ्या निर्यातींत ४८ कोटी रुपयांची वाढ झालेली आहे. १९६४–६५ सालीं भारतानें केलेल्या एकूण निर्यातीपैकी १८ टक्के निर्यात अमेरिकेला करण्यांत आली आहे. अमेरिकेच्या एकूण आयातीशीं तुलना करतां मात्र ही आयात २ टक्क्यापेक्षाहि कमी आहे. भारताकडून अमेरिकेला करण्यांत येणाऱ्या मालाच्या प्रकारांत गेल्या कांहीं वर्षांपासून बदल होत चाललेला आहे. पूर्वीच्या मानानें अलीकडे पक्क्या मालाच्या निर्यातीची टक्केवारी वाढलेली आहे. अमेरिकेंत उत्पादकतेंत वाढ झाली कीं त्याचा फायदा कामगारांना वाढत्या वेतनाच्या रूपानें मिळतो. त्यामुळें ज्या देशांत मजुरी स्वस्त आहे अशा देशांतील पक्का माल अमेरिकेंत आयात होऊं लागल्यास त्याचा धक्का अमेरिकेच्या उद्योगधंद्यांना पोंचतो. ह्याच परिस्थितीचा फायदा घेऊन जपाननें अमेरिकन बाजारपेठेंत आपला जम बसविला आहे. असाच फायदा भारतालाहि घेतां येईल. अमेरिकेच्या बाजारपेठेंत निर्यात करण्यावर अधिक लक्ष दिलें तर इतर अनेक परदेशीय बाजारपेठांत माल निर्यात करण्यापेक्षा तें अधिक लाभदायक होईल अशीहि शक्यता आहे. अमेरिकेला करण्यांत येणाऱ्या निर्यातींत वाढ करण्यांत एकच मोठा अडथळा आहे. तो म्हणजे, अमेरिकेची बाजारपेठ भारतापासून दूर असल्यानें वाहतुकीचा खर्च वाढतो. ह्या अडथळ्याचा विचार करण्यांत आला पाहिजे.

---

## साखरेचे मोठे कारखाने काढण्याचा विचार

भारताचे अन्नमंत्री श्री. सुब्रह्मण्यम् ह्यांनीं लोकसभेंत अशी माहिती सांगितली कीं, सरकारनें नेमलेली एक कमिटी सध्यां चालू असलेल्या साखर कारखान्यांपेक्षाहि अधिक मोठे साखर कारखाने काढण्याच्या प्रश्नाचा विचार करीत आहे. असे मोठे कारखाने काढण्यांत आले तर साखर उत्पादनाचा खर्च कमी करतां येईल अशी अपेक्षा आहे. भारतामधील साखर परदेशीं निर्यात करण्यांत येते. परंतु आंतरराष्ट्रीय बाजारपेठांतील किमतींना अनुसरून साखरेची विक्री करण्यासाठी सरकारला आर्थिक मदत द्यावी लागते. चालू वर्षी साखर निर्यात करण्याच्या कामीं सरकारला १२ कोटी रुपयांची मदत द्यावी लागेल. ही मदत देण्याचें प्रमाण कमी करतां यावें हा मोठे साखर कारखाने काढण्याचा उद्देश आहे. संकल्पित नवीन कारखाने सहकारी कारखान्यांशीं स्पर्धा करणार नाहींत. कारण, ते फक्त निर्यातीसाठीच उत्पादन करतील. देशांतर्गत साखरेच्या खपासाठी सहकारी साखर कारखान्यांनींच उत्पादन करावयाचें आहे. भारतामधील साखर कारखान्यांची यंत्रसामग्री जुनीपुराणी झालेली आहे. ही यंत्रसामग्री बदलून नवी यंत्रसामग्री बसविणें अगत्याचें झालें आहे. यंत्रसामग्री जुनी झाल्यामुळेंच साखरेचा उत्पादनखर्च वाढलेला आहे. परंतु पुष्कळशा कारखान्यांनीं नवी यंत्रसामग्री बसविण्यासंबंधीं अजून कांहींच हालचाल केलेली नाहीं. ह्या प्रश्नाचा विचार करण्याचें काम सरकारनें एका कमिटीकडे सोपविलेलें आहे आणि कमिटीकडून आलेल्या अहवालाचा सरकार सध्यां विचार करीत आहे. ४ थ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत ५ लाख टन साखर निर्यात करण्याचें उद्दिष्ट ठरविण्यांत आलेलें आहे. अलीकडे साखरेच्या आंतरराष्ट्रीय बाजारांत अस्थिर वातावरण निर्माण झालेलें असून किमती बऱ्याच घसरल्या आहेत.

---

## विकासशील देशांतील करपद्धतीबाबत सूचना

अविकसित देशांची आर्थिक उन्नति घडवून आणण्याच्या कामांत पैशाच्या टंचाईचा प्रश्न फार विकट असतो. त्या त्या देशांतील सरकारें कर्ज व कर ह्यांच्या रूपानें विकासाच्या कामासाठी लागणारा पैसा उभारण्याचे प्रयत्न करीत असतात. पण तो पुरा पडत नाहीं; उलट देश जितका गरीब तितके नवे कर बसविण्याचे मार्गहि कमी पडतात. अविकसित अगर अर्धविकसित देशांना करांच्या रूपानें पैसा कसा गोळा करतां येईल ह्यासंबंधीं विचार करण्याकरतां इस्राइल देशांत ३५ देशांच्या प्रतिनिधींची परिषद भरविण्यांत आली होती. ब्रिटनच्या मजूर सरकारचे एक आर्थिक सल्लागार डॉ. निकोलस काल्डोर हेहि ह्या परिषदेला हजर राहिले होते. विकासशील देशांतील अर्थव्यवस्थेंत चलनाच्या कार्यासंबंधीं बोलतांना त्यांनीं करांविषयीं सूचना केल्या. त्यांच्या मतानें ग्रामीण भागांतील लोकांच्या शेतीच्या उत्पन्नावर अधिक कर बसविण्यांत यावा. त्याशिवाय सध्यांच्या प्राप्तिकराबरोबरच संपत्तिकराचीहि आकारणी करण्यांत यावी. खाणीच्या धंद्यांत अगर मळ्याच्या धंद्यांत ज्या परदेशीय कंपन्यांनीं आपलें भांडवल गुंतविलें असेल त्यांच्यावरहि कर बसविण्यांत यावा. डॉ. काल्डोर ह्यांच्या मतानें त्यांच्या सूचनांचा अवलंब केल्यानें मागासलेल्या देशांना पैसा उभारण्याचीं नवीन साधनें तर उपलब्ध होतीलच पण त्याशिवाय देशाच्या उत्पन्नाची फेरवांटणी करणेंहि त्यांच्यामुळें शक्य होईल. ते म्हणतात, कीं विकासशील देशांत करांच्या रूपानें पैसा उभा करण्यास अद्याप पुष्कळ वाव आहे. सध्यां कांहीं थोडे श्रीमंत लोक चैनीखातर पैसा उडवीत आहेत. करांच्या रूपानें त्यांतील कांहीं हिस्सा लोकांसाठी उत्पादक रोजगार उपलब्ध करून देण्याकडे वळवितां येण्यासारखा आहे. डॉ. काल्डोर ह्यांनीं केलेल्या सूचनांवर आफ्रिका, आशिआ आणि अमेरिकेंतील प्रतिनिधींनीं विरोधी टीका केली.

## बिगर-बँकिंग कंपन्यांकडील ठेवी

### रिझर्व्ह बँकेचा आढावा

बिगर-बँकिंग कंपन्यांकडील ठेवींची पाहणी रिझर्व्ह बँकेनें केली, तिचा तपशील प्रसिद्ध झाला आहे. ३१ मार्च, १९६४ रोजींच्या ठेवींची माहिती देणाऱ्या १,७८९ कंपन्यांच्या ठेवींचा परामर्श ह्या पाहणींत घेतलेला आहे. पाहणीचा निष्कर्ष असा :—(१) ३१ मार्च, १९६२ ते ३१ मार्च, १९६४ ह्या मुदतींत ठेवी घेणाऱ्या कंपन्यांची संख्या बरीच वाढली आहे आणि ठेवींतहि खूप वाढ झाली आहे. (२) सामान्य जनतेकडून घेतलेल्या ठेवींचा भरणा मोठा आहे. (३) प्रमुख शेड्यूल्ड बँका देत असलेल्या व्याजाच्या दरापेक्षा कंपन्या, विशेषतः खाजगी कंपन्या, देत असलेल्या व्याजाचा दर बराच जास्त होता. (४) एकूण ठेवींत परत-फेडीची निश्चित मुदत नसलेल्या, पण मागतांक्षणींच किंवा ठराविक मुदतीच्या नोटिशीनें द्यावयाच्या ठेवींचा भरणा मोठा होता.

ठेवींमधील वाढ खालील तक्ता स्पष्ट करील :—

### ठेवींमधील वाढ ( कोटी रु. )

मार्चअखेर

| | १९६२ | | १९६३ | | १९६४ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | कळविणाऱ्या कंपन्या | ठेवींची रक्कम | कळविणाऱ्या कंपन्या | ठेवींची रक्कम | कळविणाऱ्या कंपन्या | ठेवींची रक्कम |
| | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| अ. अनार्थिक सामाईक भांडवलाच्या कंपन्या | १२०८ | ९७.५ | १३०९ | ११२.० | १३९५ | १३५.६ |
| ब. आर्थिक सामाईक भांडवलाच्या कंपन्या | | | | | | |
| (१) हायर परचेस | ११३ | १०.९ | १३६ | १२.१ | १४० | १४.८ |
| (२) इतर आर्थिक संस्था | २२१ | २७.१ | २३२ | २९.८ | २५४ | ३५.५ |

ठेवींमध्यें १९६२–६४ ह्या मुदतींत ५०.४ कोटी रुपयांची म्हणजे ३७% वाढ झाली. १८५.९ कोटी रुपयांच्या ठेवी मार्च १९६४ मध्यें होत्या, त्यांपैकी १२४.८ कोटी रु. च्या ठेवी ८३३ पब्लिक कंपन्यांकडे होत्या आणि ६०.८ कोटी रु. च्या ठेवी ९४७ प्रायव्हेट कंपन्यांकडे होत्या. ८३३ पब्लिक कंपन्यांपैकी ७२२ (८७%) कंपन्या 'नॉन–फिनॅन्शिअल' कंपन्या होत्या व त्यांच्याकडे ९७.७ कोटी रु. च्या ठेवी होत्या. उरलेल्या १११ फिनॅन्शिअल कंपन्या होत्या व त्यांच्याकडे २७.१ कोटी रु. च्या ठेवी होत्या.

### राज्यवार छाननी

राज्यवार ठेवींची छाननी केली, तर महाराष्ट्राचा वांटा सर्वांत जास्त (६३.२ कोटी रु., ३४%) होता. त्याच्याखालोखाल प. बंगाल (२५.५ कोटी रु., १९%), मद्रास (३०.७ कोटी रु., १७%), दिल्ली (२२.५ कोटी रु., १२%) आणि गुजरात (१६.१ कोटी रु., ९%)-हीं येतात. ठेवींची वाढहि महाराष्ट्रांतच सर्वांत जास्त झाली.

### ठेवी कोणीं ठेवल्या ?

ठेवींत खाजगी व्यक्तींच्या ठेवीच जास्त होत्या. त्याखालोखाल लिमिटेड कंपन्यांनीं व मॅनेजिंग एजंटांनीं ठेवलेल्या ठेवींचा क्रम लागतो :—

(आकडे कोटी रुपयांचे)

| | खात्यांची संख्या | ठेवींची रक्कम |
|---|---|---|
| १. जॉइंट स्टॉक कंपन्या | १६,५०० | ३९.७ |
| २. मॅनेजिंग एजंट्स इ. | ८०० | १७.५ |
| ३. सबसिडिअरीज, असोसिएटस् इ. | १,६०० | १४.८ |
| ४. इतर सर्व | २,३०,१०० | ११३.९ |
| एकूण | २,४९,००० | १८५.९ |

### ठेवींची मुदत

(आकडे कोटी रु. चे)

| मार्च, १९६४ | खात्यांची संख्या | ठेवींची रक्कम |
|---|---|---|
| १. ३ महिन्यांपर्यंत | २,४०० | ३.६ |
| २. ३ ते ६ महिने | ८,५०० | १२.४ |
| ३. ६ महिने ते १ वर्ष | ७९,५०० | ४५.२ |
| ४. १२ ते २४ महिने | १५,३०० | ८.८ |
| ५. २४ ते ३६ महिने | १२,२०० | ४.८ |
| ६. ३६ महिन्यांपेक्षा जास्त | १८,३०० | १४.० |
| ७. इतर ठेवी* | १,१२,८०० | ९७.१ |
| ८. एकूण | २,४९,००० | १८५.९ |

*ज्यांची परतफेडीची मुदत निश्चित नाहीं, पण ज्या मागणी-बरहुकूम किंवा ठराविक नोटिशीनंतर परत करावयाच्या ठेवी.

### ठेवी घेणारे औद्योगिक घटक

(आकडे कोटी रु. चे)

| | | |
|---|---|---|
| १. | कॉटन टेक्स्टाइल्स | ४४.५ |
| २. | व्यापार | १३.९ |
| ३. | इंजिनिअरिंग | ११.१ |
| ४. | केमिकल्स | ७.६ |
| ५. | साखर | ७.१ |
| ६. | सिमेंट | ३.९ |
| ७. | कागद | २.५ |
| ८. | सर्व उद्योगधंदे | १३५.६ |

### परदेशीय चलनाच्या टंचाईवर उपाय

आंतरराष्ट्रीय विकासासंबंधीं विचार करणाऱ्या मद्रास येथील एका संघटनेनें भारतापुढील परदेशीय चलनाच्या टंचाईसंबंधीं एक परिसंवाद भरविला होता. ह्या परिसंवादांत एक उद्योगपति, एक अर्थशास्त्रज्ञ आणि एक स्टॉक ब्रोकर ह्यांनीं भाग घेतला. परदेशीय चलनाची टंचाई ही एक गंभीर बाब आहे असें सर्वांचेंच मत पडलें. पण त्याच्या तीव्रतेसंबंधीं मात्र मतभेद झाले. प्रत्येकानें आपआपल्या दृष्टिकोणांतून ह्या टंचाईवर उपाय सुचविले. तुटीचीं अंदाजपत्रकें चालू ठेवावींत, पंचवार्षिक कार्यक्रमाला फांटा द्यावा, निर्यातीच्या मालावरील कर कमी करावे, कर्जे देण्यावरील निर्बंध उठवावे, कच्च्या मालाच्या आयातीवरील नियंत्रणें शिथिल करावीं, परदेशीय कर्जांच्या परतफेडीच्या मुदती वाढवून घ्याव्या, इत्यादी उपाय सुचविण्यांत आले.

### नागपूरजवळील वीज–उत्पादनाचें केंद्र

नागपूरपासून १० मैलांवर कोराडी येथें उष्णतेच्या साह्यानें वीज निर्माण करणारें एक केंद्र उभारण्यांत येणार आहे. ह्या केंद्रासंबंधींचा अहवाल महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी बोर्डानें तयार करून मध्यवर्ती पाणीपुरवठा व वीज मंडळाकडे धाडला आहे. संकल्पित केंद्रांत ५६० मेगॅवॅट विजेचें उत्पादन करण्यांत यावयाचें आहे. केंद्रासंबंधीं माहिती देतांना महाराष्ट्र वीज बोर्डाचे प्रतिनिधि श्री. तिरपुडे म्हणाले कीं ह्या केंद्राच्या उभारणीसाठी सुमारें ५५·१५ कोटी रुपये खर्च येईल असा अंदाज आहे. त्यापैकी ११·९० कोटी रुपये मुलकी बांधकामावर खर्च करण्यांत येणार आहेत व २६·१० कोटी रुपये यांत्रिक विभागावर खर्च करण्यांत येतील. टर्बाइन्स व जनरेटर्स ह्यांवरील खर्च वरील रकमेंतच धरण्यांत आला आहे. त्याशिवाय ७·१५ कोटी रुपये विजेसंबंधींच्या कामांवर खर्च करण्यांत यावयाचे आहेत. १९७०-७१ च्या सुमाराला हें विद्युत्–केंद्र उभारून पुरें करण्यांत येईल. त्याची उत्पादनक्षमता प्रारंभीं ५६० मेगॅवॅट राहील. परंतु नंतर ती १,००० मेगॅवॅटपर्यंत वाढवितां येईल. केंद्रांत उत्पन्न होणाऱ्या विजेमुळें नागपूर भागांतील उद्योगीकरणाला मदत होईल. त्याशिवाय खानदेश आणि मराठवाडा भागांतील कांहीं ठिकाणींहि विजेचा पुरवठा करतां येईल. मध्य रेल्वेनें इगतपुरी–भुसावळ रेल्वेमार्गाचें विद्युतीकरण करण्याची योजना आखलेली आहे. ह्या योजनेसाठीहि केंद्रांतून विजेचा पुरवठा करतां येईल. १९६९–७० च्या सुमारास केंद्राचा एक घटक बांधून पुरा होईल. त्या सुमारास ह्या भागांतील विजेच्या पुरवठ्याची मागणी ६०० मेगॅवॅटपर्यंत वाढलेली असेल. महाराष्ट्रांतील कोयना विद्युत् केंद्राची जेवढी उत्पादनक्षमता आहे तितकीच उत्पादनक्षमता ह्याहि केंद्राची राहील. विदर्भांतील शेतकऱ्यांना तिचा फायदा मिळूं शकेल. विजेचा उपयोग करून पाणी खेचण्याचे पंप त्यांना चालवितां येतील आणि त्यांचा पाणीपुरवठ्याचा प्रश्न बराच सुलभ होईल.

---

### औद्योगिक क्षेत्रासहि महर्गतेची झळ

उत्पादन वाढीच्या अभावीं किमती रोखून धरणें दिवसेंदिवस कठीण होत चाललें आहे. जून, १९६४ ते जून १९६५ ह्या वर्षांत घाऊक मालाच्या किमतीचा इंडेक्स नंबर ६·९% नें वाढला. विशेषतः औद्योगिक कच्च्या मालाच्या किमती फारच (१४·८%) वाढल्या. आतांपर्यंत अन्नाची महर्गताच वाढत चालली होती; आतां औद्योगिक क्षेत्रासहि महर्गतेची विशेष झळ लागूं लागली आहे. विशेषतः तागाचा माल गेल्या वर्षी ३९·५% नें महागला. तागाच्या तंतूंचें उत्पादन घटण्याचा तो परिणाम आहे. अन्नामध्यें दूध व तूप १७·८% महागलें आहे. मासे, अंडीं व मांस ह्यांच्या किमतींत २०·९% वाढ झाली आहे. गेल्या दोन वर्षांतील महागाईचा विचार केला तर चित्र अधिकच भयानक दिसतें. मालाच्या घाऊक किमती वाढल्या, त्याचें प्रतिबिंब किरकोळ विक्रीच्या किमतींतहि पडलें आहे. मद्रासमधील कामगारांच्या राहणीवर त्याचा सर्वांत जास्त परिणाम झालेला दिसतो. पगार मिळणाऱ्या नोकरवर्गाची आणि कामगारांची वेतनवाढीची मागणी त्या महागाईतूनच निर्माण झालेली आहे. बहुतेक मोठ्या उद्योगधंद्यांतून महागाईभत्त्याचें प्रमाण राहणीच्या खर्चाच्या मानाशीं निगडित असल्यामुळें तो भत्ता स्वाभाविकच वाढत जात आहे. त्याचा परिणाम, जादा चलन हें उपलब्ध माल घेण्यासाठी स्पर्धा करून महागाईत भर घालीत आहे.


## स्वास्तिकचा माल निर्यात होऊं लागला

—: कांहीं बोलके आंकडे :—

| | |
|---|---|
| १९६३ सालांतील मालाची विक्री | रु. २ कोटी, २ लक्ष |
| १९६३ अखेर वसूल भाग–भांडवल | रु. ४३,८१,४८५ |
| कामगारांची संख्या | १,२०० चे वर |
| कारखान्याच्या बांधलेल्या जागेचें क्षेत्रफळ | १,२०,००० चौ. फू. |

— प्रमुख उत्पादनें —

गमबूट्स—होजपाईप्स—प्रेशर होजेस

ग्लोव्हज—इरेझर्स—ऑईल सीलस

व

स्वरूप केबल्स

## स्वस्तिक रबर प्रॉडक्ट्स लि.

स्वस्तिक गृह, खडकी, पुणें ३.

(टेलिफोन नं. : ५५२०१)

## दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.

"चिरमुले निकेतन", १४३/१४६ भवानी पेठ

सातारा–शहर

*दि. १८-७-६५ पासून ठेवींवरील व्याजाचे दरांत खालीलप्रमाणें वाढ झालेली आहे.*

### मुदतीच्या ठेवी

| मुदत | | व्याजाचा दर |
|---|---|---|
| १ वर्ष | द. सा. द. शें. | ६=२५ |
| २ वर्षें | ,, | ६=५० |
| ३ वर्षें | ,, | ६=७५ |
| ५ वर्षें | ,, | ७=२५ |
| ७ वर्षें | ,, | ७=५० |
| ९ वर्षें व जास्त | ,, | ७=६२ |

सेव्हिंग्ज बँक खातें:—दि. १–२–६५ पासून ४ टक्के

*तसेंच अल्प मुदतीच्या ठेवी आकर्षक दरानें स्वीकारल्या जातील.*

याबाबत आमच्या कोणत्याहि शाखेंत अधिक माहिती मिळूं शकेल.

# स्टेट बँकेच्या तुलनेनें इतर बँकांची प्रगति

स्टेट बँक ऑफ इंडियाचा १० वा वाढदिवस साजरा झाला, त्या वेळीं त्या बँकेनें गेल्या १० वर्षांत केलेल्या प्रगतीचा आढावा घेण्यांत आला. परंतु, त्याच मुदतींत प्रायव्हेट सेक्टरमधील बँकांनीं स्टेट बँकेपेक्षाहि जास्त गतीनें प्रगति केली आहे, ह्याचें विस्मरण झालें. खालील तक्त्यावरून दिसून येईल, कीं प्रमुख शेड्यूल्ड बँकांकडील ठेवी स्टेट बँकेपेक्षा कितीतरी जास्त प्रमाणांत वाढल्या आहेत. कांहीं बँकांच्या ठेवी तर ८ ते १० पट वाढल्या आहेत. ( उदाहरणार्थ : कॅनरा बँक, युनियन बँक, सिंडिकेट बँक आणि महाराष्ट्र बँक. ) कित्येक लहान बँकांचें त्यांच्यांत विलिनीकरण झालें, त्याचा हा परिणाम अंशतः असला, तरी त्यांच्या प्रगतीची गति निःसंशय अधिक होती.

शाखावाढीच्या बाबतींतहि असेंच म्हणतां येईल. स्टेट बँकेच्या शाखा दुपटीपेक्षा अधिक झाल्या, तर प्रायव्हेट सेक्टर-मधील १४ प्रमुख बँकांच्या शाखाहि जवळ जवळ दुप्पट झाल्या आहेत. कांहींच्या शाखांची वाढ १००% पेक्षा जास्त आहे. ( उदाहरणार्थ : बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ बरोडा, युनायटेड कमर्शिअल बँक, कॅनरा बँक, देना बँक, महाराष्ट्र बँक, इ. ) रिझर्व्ह बँकेकडून त्यांना स्टेट बँकेप्रमाणेंच मदत मिळाली असती आणि निमसरकारी पाठिंबा मिळाला असता तर त्यांनीं ह्यापेक्षाहि जास्त शाखा वाढविल्या असत्या.

### ठेवींमधील वाढ : १९५४–६४

(कोटी रु.)

| बँकेचें नांव | १९५४ मधील ठेवी | १९६४ मधील ठेवी | दहा वर्षांतील वाढ % |
|---|---|---|---|
| स्टेट बँक ऑफ इंडिया | २३१ | ५२९ | १५० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया | १२३ | २७७ | १२६ |
| पंजाब नॅशनल बँक | ७६ | २१५ | १८४ |
| बँक ऑफ इंडिया | ५८ | २०५ | २५२ |
| बँक ऑफ बरोडा | ३५ | १७० | ३८७ |
| युनायटेड कमर्शिअल बँक | ४० | १३४ | २३१ |
| युनायटेड बँक ऑफ इंडिया | ३० | ८९ | १९१ |
| कॅनरा बँक | ९ | ८८ | ८८९ |
| अलाहाबाद बँक | ३१ | ७६ | १४२ |
| देना बँक | १३ | ७२ | ४७६ |
| यूनियन बँक ऑफ इंडिया | ६ | ६० | ९५३ |
| इंडियन बँक | २५ | ५५ | १२२ |
| सिंडिकेट बँक | ६ | ५१ | ८५३ |
| इंडियन ओव्हरसीज बँक | ११ | ४७ | ३२६ |
| बँक ऑफ महाराष्ट्र | ४ | ३७ | ८०९ |

### शाखांची वाढ : १९५४–६३

| १९५४ मधील शाखा | १९६३ मधील शाखा |
|---|---|
| ४५५ | १,०७६ |
| २८७ | ३६० |
| ३१० | ४२३ |
| ३५ | १२४ |
| ५५ | १९० |
| ८२ | १६८ |
| ८१ | १०६ |
| ४६ | २३६ |
| ८५ | ९४ |
| ६२ | १२९ |
| ९ | ७४ |
| ९२ | १४७ |
| ९३ | १९० |
| ३९ | ८४ |
| २९ | ८९ |
| १३०५ | २,४१४ |

( प्रायव्हेस्ट सेक्टरमधलि १४ बँकांची बेरीज )

**वर्धा येथें मेडिकल कॉलेज**—कस्तुरबा आरोग्य संघटनेनें पुढील शैक्षणिक वर्षापासून वर्धा येथें मेडिकल कॉलेज उभारण्याचें ठरविलें आहे. कॉलेजच्या इमारतीसाठी भारत सरकारकडून १ कोटी रुपये देणगी मिळण्याची शक्यता आहे. प्रथम ५० विद्या-र्थ्यांना कॉलेजांत प्रवेश देण्यांत येणार आहे. वर्धा जिल्हा परिषद सेवाग्रामनजीकची २०० एकर जमीन कॉलेजसाठी देणार आहे. ह्या जागेवर कॉलेजला लागणाऱ्या इमारती बांधण्यांत येतील.

**चोरटें सोनें पाठविण्याचा प्रयत्न**—सिलोनमधील एका वृत्तपत्रानें पोलीस अधिकाऱ्यांचा हवाला देऊन असें प्रसिद्ध केलें आहे कीं, भारतांत चोरटें सोनें पाठविण्याची खटपट करणारी एक चिनी टोळी सिलोनमध्यें काम करीत आहे. सोन्याचा उप-योग भारतांत चिनी प्रचार करण्यासाठीं व्हावयाचा आहे. सोन्याची खरेदी चीनचे हाँगकाँगमधील हस्तक तेथेंच करतात व नंतर ते सिलोनला पाठवितात.

**मोटारींच्या उत्पादनांत अडचण**—भारताला भासणाऱ्या परदेशीय टंचाईमुळें मोटारी तयार करणाऱ्या कारखान्यांपुढें अडचण निर्माण होण्याचा संभव आहे. निर्बंधरहित परदेशीय चलन मिळण्याची शक्यता कमी असल्यानें कांहीं आवश्यक सुटे भाग आयात करणें अशक्य होणार आहे. ह्या भागांच्या जागीं देशी बनावटींचे भाग वापरण्याची शक्यता अजमावण्यांत येत आहे. पण देशी भाग उपलब्ध न झाल्यास येत्या सहा महिन्यांत मोटारींचे उत्पादन ५० टक्क्यांनी कमी होण्याची शक्यता आहे.

**जिल्हा परिषदांचा अभ्यास**—महाराष्ट्रांतील जिल्हा परि-षदांच्या कार्याचा अभ्यास करून त्यावर पीएच. डी. साठी प्रबंध लिहिण्याचे मेरी कॅरेस ह्या अमेरिकन विद्यार्थिनीनें ठरविलें आहे. प्रबंधासाठी लागणारी माहिती गोळा करण्यासाठी ती औरंगाबाद, अकोला, पुणें व रत्नागिरी जिल्ह्यांत फिरत आहे. दौरा संपल्यावर अमेरिकेला जाऊन ती आपला प्रबंध तयार करील. मेरी कॅरेस न्यूयॉर्कमधील असून ती मराठी उत्तम बोलूं शकते.

**कुत्र्यांना शिधाकार्डें नाहींत**—कलकत्त्यामधील कुत्रा पाळ-णाऱ्या लोकांनीं कुत्र्यांसाठी शिधाकार्डें मिळावीं म्हणून अर्ज केले होते. परंतु ते नाकारण्यांत आल्यामुळें कुत्र्यांचे मालक व्यथित झाले आहेत. ४,५०० कुत्र्यांच्या मालकांकडून असे अर्ज आले होते. सरकारचें म्हणणें असें कीं, शोकाखातर पाळलेले कुत्रे जातिवंत असतात व त्यांना भातापेक्षा ब्रेडच अधिक आवडते. ब्रेडवर नियंत्रण नसल्यानें त्यांना भाताची गरजच नाहीं.

## बँका ठेवीदाराभिमुखी झाल्या

आठवड्यांतून सहा दिवस बँका उघड्या असतात आणि पहिले पांच दिवस त्या गिऱ्हाइकांशीं दररोज चार तास, तर शनिवारीं दोन तास व्यवहार करतात, अशी सर्वसाधारण परिस्थिति आहे. स्थानिक परिस्थिति, वाहतुकीची व्यवस्था, बँकेचें ठिकाण, ह्याला अनुसरून बँक उघडण्याची व बंद होण्याची वेळ थोडी-फार बदलते एवढेंच.

बँकेचा गिऱ्हाइकांकडे पाहण्याचा दृष्टिकोण मात्र झपाट्यानें बदलत आहे. पूर्वी बँकांना जणू खातेदारांची व कर्जदारांची गरजच नव्हती. तेव्हां त्यांच्या गरजा, सोयी, ह्या बाबी बँकिंगच्या वेळेचा विचार करतांना लक्षांत घेण्याचे बँकांना कारणच नव्हतें. ठेवीदार हे बहुधा सुखवस्तु लोक होते; ते स्वतः बँकेंत न जातां आपल्या नोकरांकरवीं सर्व व्यवहार करीत. कर्जदारांना बँकेंत जाण्याचें टाळणें शक्यच नव्हतें. पण मोठ्या बँकेकडून आपल्याला कर्ज मिळतें, हीच त्यांना प्रतिष्ठेची बाब होती.

आतां परिस्थिति खूपच बदलली आहे. ठेवींसाठी स्पर्धा तीव्र होत चालली आहे. बँका-बँकाच नव्हे, तर बँका आणि बिगर-बँकिंग संस्थाहि ठेवींसाठी स्पर्धा करीत आहेत. केवळ ज्यास्त व्याज देऊनच नव्हे, तर अन्य मार्गेहि बँका ठेवीदारांना आकर्षू पाहात आहेत. कर्ज मिळणें अवघड होत चालल्यामुळें, कर्जदारांना मात्र बँकांच्या तंत्रानेंच चालावें लागत आहे. तरीसुद्धां, कर्ज मागणाराचा दृष्टिकोण समजून घेण्याकडे बँकांची प्रवृत्ति आहे. तथापि, ठेवीदारांच्या संबंधांतच त्यांच्या वागण्यांत विशेष सुधारणा दिसून येत आहे. अगदीं लहान ठेवीसुद्धां स्वीकारण्यास मोठ्या बँकाहि उत्सुकता दर्शवात आहेत. पूर्वी शाखा उघडतांना धंदा मिळण्याची दृष्टि होती; आतां ठेवी मिळण्याची दृष्टि प्राधान्य पावत आहे. उपनगरांतून आणि लहानसहान ग्रामीण विभागांतून बँका पसरूं लागल्या आहेत, हें त्याचेंच लक्षण आहे.

व्यापारी पेठेंतील बँकेपेक्षा केवळ राहण्याच्या वस्तीमधील बँकेच्या व्यवहाराच्या वेळा वेगळ्या असणें जरूरीचें असतें. फक्त चार तास व्यवहारासाठी उघडें असणें ग्रामीण भागांत पुरें पडत नाहीं. संबर्बन भागांत बँकांनीं आपल्या कामाच्या वेळा सकाळ-संध्याकाळ ठेवण्यास सुरुवात केली आहे. ह्या बाबतींत अनेक अडचणींना तोंड द्यावें लागलें आहे. बँकेच्या व्यवहाराचे एकूण तास वाढवावे लागले, त्यामुळें नोकरांच्या तक्रारी येऊं लागल्या. कांहीं ठिकाणीं बँका शनिवार-रविवारींहि उघड्या राहूं लागल्या. पण निगोशिएबल इन्स्ट्रुमेंटस ॲक्ट त्याच्या आड आला. व्यवहाराच्या वेळेच्या बाबतींत नव्या शाखांतून बँकांची वृत्ति लवचिकपणाची आहे. भर बाजारपेठेंतील कचेऱ्यांतून मात्र बँका परंपरेलाच चिकटून आहेत.

टेक्स्टाइल व इतर बाजारांतील कचेऱ्यांचें काम दुपारीं सुरू होतें, तोंवर बँकांच्या कामाची निम्मी वेळ संपूनहि गेलेली असतें, तर कांहीं कचेऱ्या ९ किंवा ९-३० ला सुरू होतात पण बँका उघडण्यास अवकाश असतो. तरीसुद्धां, बँकांच्या व्यवहारांच्या वेळा लोकांना इतक्या अंगवळणीं पडल्या आहेत, कीं त्यांची तक्रार कुठेंच फारशी दिसत नाहीं. शनिवारीं बँकांच्या व्यवहाराची वेळ इतर दिवसांपेक्षा कमी असते, परंतु त्या दिवशीं कामहि इतर दिवसांइतकेंच जवळजवळ असते. तेव्हां, नोकरांच्या कामाचे तास न वाढवितांहि गिऱ्हाइकांशीं व्यवहाराचे तास वाढवितां येणें जरूरीचें दिसतें. शनिवारपुरताच नाहीं, तर सर्व वारांच्या व्यवहारांच्या कामाच्या तासांचा फेरविचार करण्याची वेळ आली आहे.

## घरगुती जळणासाठी नवीन प्रकारचा कोळसा

नेवेली येथील कनिष्ठ प्रतीच्या कोळशापासून घरगुती जळणासाठी वापरतां येण्यासारखा नव्या प्रकारचा कोळसा बनविण्यांत आला आहे. नेवेली येथें एका सहकारी संस्थेमार्फत 'लेको' ह्या नांवानें त्याची विक्री सुरू करण्यांत आली आहे. नवीन कोळसा तयार करण्याची यंत्रसामग्री जर्मनीहून मागविण्यांत आलेली आहे. हा कोळसा नेहमींच्या कोळशापेक्षा स्वस्त तर आहेच, पण उष्णता पुरविण्याच्या दृष्टीनें अधिक कार्यक्षम आहे. १ किलोग्रॅम लेको कोळशाच्या उपयोगानें १.२५ किलोग्रॅम लोणारी कोळशाच्या साह्यानें किंवा ३.२५ किलो जळाऊ लाकडाच्या उपयोगानें उत्पन्न होणारी उष्णता मिळूं शकते. सुधारलेल्या पद्धतीच्या भट्ट्या वापरण्यांत आल्या तर त्यापासून आणखीहि अधिक प्रमाणांत उष्णता मिळूं शकेल. नेवेली लिग्नाइट कॉर्पोरेशन अशा सुधारलेल्या भट्ट्या तयार करण्याच्या खटपटींत आहे.

---

## उंटाचें व गाढवाचें दूधहि सकस असतें

माणसाच्या आहारांत दुधाला महत्त्वाचें स्थान आहे. पण भारतांत इतर अन्नपदार्थांप्रमाणें दुधाचाहि तुटवडा आहे. मोठ्या शहरांतील गौळवाड्यांनाहि हा तुटवडा जाणवतो. भारतामधील दुभत्या गुरांची संख्या सुमारें २० कोटी आहे. त्यांच्यापासून दरसाल २-२ कोटी टन दुधाचा पुरवठा होतो. तरीपण भारतामधील दरडोई दुधाच्या वापराचें प्रमाण रोजीं ६ औंसापेक्षाहि कमी आहे. इतर अनेक देशांतील नागरिकांना रोजीं २० औंस दुधाचा पुरवठा होऊं शकतो. अन्नाचा दर्जा राखण्याचें कार्य करणाऱ्या मध्यवर्ती कमिटीनें आतां असें जाहीर केलें आहे कीं उंटाचें व गाढवाचें दूधहि सकस अन्न म्हणून वापरतां येण्यासारखें आहे. उंटाचें दूध आस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडमध्यें उपयोगांत आणण्यांत येतें, खुद्द भारतांत राजस्थानांतील कांहीं गांवांतूनहि तें विकलें जातें. दुधाची टंचाई थोडी-फार भरून काढण्यास ह्या जनावरांच्या दुधाचा उपयोग होईल. प्राणिजन्य दुधाबरोबरच वनस्पतिजन्य दुधाचाहि वापर करतां येण्यासारखा आहे. अमेरिका व चीनमध्यें सोयाबीनपासून काढलेल्या दुधाचे पदार्थ प्रचारांत आहेत.

---

## होटेलच्या धंद्यांत अमेरिकन भांडवल

भारत सरकारचें वाहतूक खातें सुप्रसिद्ध अमेरिकन उद्योगपति मि. हिल्टन ह्यांच्या साह्यानें प्रशस्त होटेल्स काढण्यास अनुकूल आहे. सुरुवातीला हें सहकार्य खाजगी मालकीच्या होटेल्सच्या विभागांत घ्यावें असा सरकारचा मानस आहे. त्यानंतर थोडासा अनुभव आल्यावर सार्वजनिक मालकीच्या विभागांतहि हिल्टन होटेल्स इंटरनॅशनल ह्या संघटनेचें साह्य घेण्याचा विचार सरकार करील. सध्यां हा प्रश्न विचाराधीन आहे. परंतु सरकारची अनुमति मिळाल्यास मुंबईमधील एक मोठी कंपनी हिल्टन होटेल्सच्या सहकार्यानें ह्या धंद्यांत पदार्पण करील. सार्वजनिक विभागांत दोन मोठीं होटेल्स बांधण्याची योजना ह्या संघटनेतर्फे सरकारला सादर करण्यांत आली आहे. त्यांपैकी एक होटेल कलकत्त्यांत आणि एक दिल्लींत उभारलें जाईल. प्रत्येक होटेलमध्यें ४०० खोल्यांची व्यवस्था करण्यांत येईल. ह्या धंद्यांत दरसाल १० लाख डॉलर्स एकूण नफा होईल, असा अंदाज करण्यांत आला आहे.

---

**लहान मुलांमध्यें चहाची आवड निर्माण करण्यासाठीं मोहीम**

लहान मुलांमध्यें चहा अधिक खपावा म्हणून मॅदर अॅण्ड क्राऊथर ही लंडनची अॅड्व्हर्टाइझिंग एजन्सी एक ऑक्टोबरला सबंध ब्रिटनभर जाहिरात मोहीम सुरू करणार आहे. या मोहिमेसाठी टी बोर्ड कमिटी पैसा पुरविणार आहे. या कमिटींत भारत, सिलोन, पाकिस्तान आणि इंडोनेशियांतील चहासंघटना आहेत.

कमिटीच्या प्रवक्त्यानें सांगितलें, "ब्रिटनमध्यें प्रौढ लोक बराच चहा पितात. परंतु २५ वर्षांच्या खालच्या मुलांमध्यें चहाची आवड निर्माण करावयाची हें आमचें उद्दिष्ट आहे. कॉफी फार लोकप्रिय असल्यानें लहान मुलांची व तरुणांचीं चहापेक्षा कॉफी पिण्याकडे जास्त प्रवृत्ति दिसते. त्यांची चव बदलण्याचा आम्ही प्रयत्न करणार आहोंत. चहा पिण्याच्या संवयीबाबत आधींच बरेंच संशोधन करण्यांत आलें आहे."

जगांतील तीनचतुर्थांश चहा भारत व सिलोन पुरवितात. त्यांनीं दरवर्षी मोहिमेसाठीं २ लाख पौंड (४० लाख रुपये) पुरविण्याचें आश्वासन दिलें आहे. तेवढेच पैसे पौंडास पौंड या हिशेबानें ब्रुक बॉण्ड, लॉयन्स आणि सी. डब्ल्यु. एस्. या ब्रिटिश कंपन्या देणार आहेत. ही प्रत्येक कंपनी आयात केलेल्या चहाच्या प्रत्येक पौंडामागें एक फार्दिंग बाजूला काढून ठेवणार आहे. गेल्या वर्षी ५० कोटी पौंड चहा आयात करण्यांत आला. बहुतेक जाहिरात दूरचित्रवाणीवरून होईल पण भिंतीपत्रकांवर व वृत्तपत्रांतहि जाहिरात करण्यात येईल.

**कलकत्त्याच्या बर्ड आणि कंपनीला १ कोटी, २० लक्ष रु. दंड**

सुमारें ७० लक्ष रुपयांचें लोखंडाचें खनिज आणि सुमारें ६ कोटी रुपयांचा तागाचा माल निर्गत करतांना त्याची विलांत कमी किंमत लावली आणि खरी किंमत व दाखवलेली खोटी किंमत ह्यांच्या फरकाइतकें परदेशीय चलन दडवून त्याचा स्वतःसाठी संचय केला, ह्या कारणास्तव कलकत्ता येथील बर्ड आणि कंपनीला डायरेक्टर ऑफ इन्स्पेक्शन, कस्टम्स अॅंड सेंट्रल एक्साईज, श्री. एस. के. भट्टाचार्य ह्यांनीं १ कोटी, २० लक्ष रु. चा दंड केला आहे. बर्ड आणि कंपनीशीं संबंध असलेल्या दोन फर्म्स आणि चार व्यक्ती ह्यांना एकूण ४५ लक्ष रुपये दंड केला आहे, तो वेगळाच. बर्ड आणि कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर्स सर डब्ल्यु. एच. एस. मायकलमोर आणि मिस्टर डी. सी. बी. पिल्किंग्टन ह्यांनीं व्यक्तिशः प्रत्येकीं ५ लक्ष रु. दंड द्यावयाचा आहे. ओरिसा मिनरल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ह्या नांवासाली जपानकडे लोखंडाचें खनिज साठविलें, त्या कॉर्पोरेशनला १५ लक्ष रु. दंड झाला आहे.

**अपंगांना रोजगार पुरविण्याची जरूरी**

हिंदमधील लक्षावधि लोकांना ते काम करण्यास पात्र व तयार असतांनासुद्धां रोजगारी मिळणें अवघड होत चाललेलें आहे. चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या प्रारंभींच बेकारांचें मोठें लोढणें गळ्यांत वागवावें लागणार आहे. धडधाकट लोकांनाच जेथें काम मिळणें कठीण जातें तेथें आजारी अगर अपंगांना चरितार्थ चालविण्यासाठी काम मिळणें किती मुष्किल जात असेल त्याची कल्पनाच केलेली बरी. अशा लोकांना समाजांत स्थान मिळवून देण्याचे प्रयत्न सरकार करीत असतें. हें काम करणाऱ्या अपंग परिषदेची उन्हाळी बैठक दिल्ली येथें भरविण्यांत आली होती. भारताचे उपराष्ट्राध्यक्ष डॉ. झकीर हुसेन ह्यांनीं बैठकीचें उद्घाटन केलें. ते म्हणाले कीं शारीरिक व्यंगामुळें अपंग झालेल्यांचें जीवन स्थिरस्थावर करतांना त्यांच्या मानसिक पुनरुत्थानाकडे लक्ष देण्यांत आलें पाहिजे. दारिद्र्य, अज्ञान, आरोग्याला विघातक अशा प्रकारची परिस्थिति, ह्यांपासूनहि त्यांची सुटका करण्यांत आली पाहिजे. तथापि, अपंगांचा हा प्रश्न केवळ सरकार सोडवूं शकणार नाही. उद्योगधंदे, खाजगी धर्मादाय संस्था, ह्यांचीहि ह्यासंबंधीं कांहीं जबाबदारी आहे. त्याचबरोबर सर्व समाजाची जाणीवहि अधिक संवेदनक्षम झाली पाहिजे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत ह्या कामासाठी ९९ लाख रुपयांची तरतूद करण्यांत आली होती. चौथ्या कार्यक्रमांत ११ कोटी रुपयांची तरतूद होण्याची शक्यता आहे. अशा लोकांचे प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न करतांना परदेशांतलि कार्यपद्धतीची नक्कल करून भागण्यासारखें नाहीं. मजूर बाजारांत कामधंदा मिळविण्यासाठी अगोदरच तीव्र स्पर्धा आहे. शिवाय अकुशल कामगारांची संख्याही मोठी आहे. अशा परिस्थितींत आजारी अगर अपंगांना काम देण्याच्या सरकारच्या प्रयत्नांत मोठ्या अडचणी उभ्या राहतात.

**शेतीच्या अविकसित अवस्थेचा परिणाम**

कलकत्त्यामधील आर्थिक आणि शास्त्रीय संशोधन संघटनेनें तयार केलेल्या अहवालाप्रमाणें भारताच्या नियोजनांत शेतीच्या बाबतींत फार मोठें अपयश आलेलें आहे. त्यामुळें अर्थव्यवस्थेच्या विकासाची गतीहि मंदावली आहे. पहिल्या कार्यक्रमांत शेती व पाटबंधारे ह्यांवरील कामासाठी ६०० कोटी रुपये खर्च करण्यांत आले. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत ही रकम ९५० कोटी रुपये झाली व तिसऱ्या कार्यक्रमांत १,७३८ कोटी रुपये होईल असा अंदाज आहे. परंतु इतक्या खर्चानंतरहि शेतीपासून येणाऱ्या उत्पन्नांत फारशी भर पडलेली नाहीं. शेतीच्या व्यवसायांतील दोषांची कसून पाहणी केल्याशिवाय बरोबर उपाय सुचवितां येणार नाहींत. तथापि, मोठ्या प्रमाणावर यंत्रांच्या साह्यानें शेती करून उत्पादन वाढवितां येईल. त्यासाठी शेतकऱ्याला खतें, कीडनिवारक औषधें, शेतीचीं अवजारें आणि ट्रॅक्टर्स ह्यांचा पुरवठा पुरेशा प्रमाणावर करण्यांत आला पाहिजे.

**फळांच्या निर्यातीसाठीं कॉर्पोरेशन**

दक्षिण भारतामधील ४ राज्यांनीं फळांची निर्यात करण्यासाठी एका कॉर्पोरेशनची स्थापना केली आहे. ही निर्यातविषयक संघटना अतिपूर्वेकडील देशांना फळें निर्यात करण्याची शक्यता अजमावणार आहे. केरळमधील अननस अगर त्याच्या डबाबंद चकत्या जपानला पाठवितां येतील काय, ह्याविषयीं सध्या विचार चालू आहे. परदेशांतून आयात होणाऱ्या फळांवर जपाननें अलीकडे निर्बंध घातले होते. परंतु आता ते रद्द करण्यांत आले आहेत. केरळमधून केळीं आणि आंबे फारसे निर्यात करतां येण्यासारखे नाहींत. परदेशीय ग्राहकांना पसंत असणाऱ्या जातींचीं केळीं केरळ राज्यांत पैदा होऊं शकत नाहींत. भारताच्या जपानमधील राजप्रतिनिधीला ह्या प्रश्नाकडे लक्ष देण्यास सुचविण्यांत आलें आहे.

**१०० रुपयांची नोट लहान होणार**

सध्यांच्या शंभर रुपये किंमतीच्या चलनी नोटेचा आकार लहान करण्यांत येणार असल्याचें अर्थमंत्र्यांनीं लोकसभेंत जाहीर केलें आहे.

## दि मराठा को-ऑपरेटिव्ह क्रेडिट बँकेची अभिनंदनीय प्रगति

दि मराठा को-आपरेटिव्ह क्रेडिट बँक लि., बेळगांव-या बँकेची ता. ३०-६-६५ इ. रोजीं पुऱ्या होणाऱ्या २३ व्या वर्षाची प्रगति संतोषकारक झाली आहे. बँकेच्या सर्व व्यवहारामध्यें वाढ झालेली दिसून येते; आणि त्यामुळें बँकेला वर्षअखेर निव्वळ नफा रु. ५४६०६=७५ पैसे झाला आहे. गतवर्षापेक्षा हा नफा १२ हजार रुपयांहून अधिक झाला आहे.

अहवाल सालीं सभासदसंख्या २९९ नीं वाढली असून रिझर्व्ह फंडसूची वाढ एकूण रु. २,२२,१८३=९२ पैसे झाली आहे. शेअर भांडवल रु. ३८,५७० नें वाढलेलें असून एकूण शेअर भांडवल वसूल झालेलें रु. १,९५,५२५ इतकें आहे. शिवाय ठेवी गतवर्षी रु. २१ लाख होत्या. त्या चालू सालीं २५ लाख झाल्या असून एकूण खेळतें भांडवल रु. ३०,१८,०९५ झालें आहे.

बँकेच्या ताळेबंदावरून पाहतां बँकेची सांपत्तिक स्थिति भरभक्कम झाली असल्याचें दिसून येतें. या ठिकाणीं विशेष नमूद करण्यासारखी गोष्ट म्हणजे थकबाकीचें प्रमाण फक्त शें. ६ टक्के आहे.

बँकेचे चेअरमन श्री. अर्जुनराव घोरपडे, व्हाइस चेअरमन श्री. भरमाजीराव जाधव, तसेच डायरेक्टर्स, श्री. गोविंदराव दळवी, श्री. रघुनाथराव शिंदे, श्री. शंकरराव कुद्रे, श्री. रामचंद्रराव ताशीलदार, श्री सिद्दापा देसूरकर, श्री. श्रीकांत कणबरकर व श्री. रामचंद्रराव बिरजे यांचे बहुमोल सहकार्य लाभलें आहे.

बँकेनें गोंधळीगल्ली आणि शहीगल्ली या दोन ठिकाणीं स्वस्त धान्याचीं दुकानें चालविलीं असून त्यांचा व्यवहारहि फायदेशीर झालेला आहे.

बँकेचे खालील आकडे उद्बोधक आहेत :

| | |
|---|---|
| (१) वसूल शेअर भांडवल | रु. १,९५,५२५ |
| (२) रिझर्व्ह फंड व इतर रिझर्व्ह निधी | रु. २,३२,१८४ |
| (३) ठेवी | रु. २५,००,००० |
| (४) इन्व्हेस्टमेंटस् | रु. १०,४१,००० |
| (५) एकूण खेळतें भांडवल | रु. ३०,१८,१०० |

---

### हौशी प्रवाश्यांपासून इटलीला होणारें उत्पन्न

परदेशांतून येणाऱ्या हौशी प्रवाश्यांपासून मिळणाऱ्या उत्पन्नाच्या बाबतींत इटली देशाचा क्रमांक पहिला लागतो. इटलींतील प्रसिद्ध व सौंदर्यस्थळें पाहण्यासाठी येणाऱ्या परदेशीय प्रवाश्यांच्या संख्येंत दरसाल वाढ होत चाललेली आहे. ह्याचें श्रेय इटली सरकारच्या प्रवासी खात्याला द्यावें लागेल. केवळ प्रसिद्ध ठिकाणेंच दाखविण्यावर भर न देतां खात्यातर्फे नव्या नव्या ठिकाणांची माहिती परदेशांतून प्रसिद्ध करण्यांत येते. त्याचबरोबर प्रवासी इटलींत आल्यावर त्याची सोय करण्याकडे कसोशीनें लक्ष पुरविण्यांत येतें. त्याचा प्रवास जलदीनें होईल इकडे लक्ष देण्यांत येतें. जकारी तपासणीसारख्या बाबी कमींत कमी वेळांत हातावेगळ्या करण्यांत येतात. साहजिकच अधिकाधिक प्रवासी आकृष्ट होत आहेत. १९६५ मध्यें इटलींत येणाऱ्या हौशी प्रवाशांच्या संख्येचा उच्चांक गांठला जाण्याची शक्यता आहे. गेल्या महिन्यांतील एका आठवड्यांतच ५ लाख परदेशीयांनीं इटलींत प्रवेश केला. अशा प्रवाश्यांपासून इटलीला दरसाल ४०० कोटी रुपयांचें परदेशीय चलन मिळतें.

## टेलिव्हिजन ड्राइव्ह-इन बँकिंगचा भारतांत प्रारंभ

### इंडियन ओव्हरसीज बँकेची आघाडी

इंडियन ओव्हरसीज बँक लि. नें मद्रास येथील मौंट रोडवरील आपल्या कॅथेड्रल शाखेंत टेलिव्हिजन ड्राइव्ह-इन बँकिंगला २६ ऑगस्ट रोजीं प्रारंभ करून हिंदी बँकिंगमध्यें क्रांतिकारक आघाडी मारली आहे. फिलिप्स क्लोस्ड्-सर्किट टेलिव्हिजनच्या साहाय्यानें चेकचे पैसे देण्यांत आतां कमालीची बचत होत आहे. कौंटरवरील कर्मचारी एका काचेवरती चेक उलटा करून ठेवतो आणि त्यावर फ्लॅप दाबतो. चेकचें चित्र विद्युत्वेगानें जाऊन लेजर खात्यांतील टेलिव्हिजनच्या पडद्यावर मोठ्या आकारांत प्रदर्शित होतें. अकौंटंट तत्परतेनें तपासून "होय" किंवा "नाहीं" चा संदेश परत पाठवतो. हा संदेश काचेवरील चेकवर इलेक्ट्रोमॅग्नेटिक पद्धतीनें स्पष्ट उमटतो. हें होईपर्यंत, कर्मचारी कॅश तयार ठेवतो आणि संदेश मिळतांच ती गिऱ्हाइकाला देतो. हें सर्व होण्यास कांहीं सेकंदहि पुरे होतात. इंडियन ओव्हरसीज बँकेनें, मोटारींतील गिऱ्हाइकांनीं उतरावें न लागतां कांहीं सेकंदांतच कॅश भरण्या-काढण्याची व्यवस्था ह्या प्रकारें केली आहे. मद्रासचे हंगामी गव्हर्नर, श्री. पी. चंद्रारेड्डी, ह्यांनीं ह्या टी. व्ही. ड्राइव्ह-इन बँकेचें उद्घाटन केलें.

### भटक्या जमातींचें पुनर्वसन

राजस्थानच्या पश्चिम भागांत दुभत्या जनावरांची पैदास करणाऱ्या भटक्यांच्या टोळ्या नांदतात. दुभत्या जनावरांची पैदास अधिक शास्त्रशुद्ध रीतीनें व्हावी व टोळ्यांचें जीवन स्थिर करावें म्हणून राज्य सरकारनें एक योजना आंखली आहे. ह्या योजनेसाठी २५·७० लाख रुपये खर्च करण्यांत येणार आहेत. पश्चिम राजस्थानांतील १० लाख भटकीं कुटुंबें १६,२६० चौरस मैलांत संचार करून आपली गुजराण करीत असतात. जनावरांना व माणसांना पिण्याचें पाणी पुरवण्यासाठी २४ कुंडें बांधण्यांत येणार असून १४ ट्यूब विहिरी खोदण्यांत येणार आहेत. ह्या कामासाठी ८·३८ लाख रुपये खर्च करण्यांत येतील.

---

### तांदुळाची मोठ्या प्रमाणांत होणारी नासाडी

मध्यवर्ती अन्नसंशोधन संस्थेनें केलेल्या अंदाजाप्रमाणें भारतांत दरसाल १·१ कोटी टन तांदूळ कोणाच्या मुखीं न पडतां नाश पावतो. तांदुळांच्या एकूण उत्पादनाच्या एकचतुर्थांश इतका तांदूळ अशा रीतीनें वाया जातो. उंदीर, घुशी, कीडमुंगी इत्यादि प्राणी १० ते १५ टक्के तांदूळ फस्त करतात. तांदूळ सांठविण्याची संपूर्णपणें सुरक्षित अशी व्यवस्था नसल्यामुळें असें होतें. त्यानंतर भात सडण्याच्या मागासलेल्या पद्धतीमुळें आणखी ५ ते १० टक्के तांदूळ नष्ट होतो. गेल्या वर्षी भारतानें ७० लाख टन अन्नधान्याची आयात केली. ह्यावरून होणारी नासधूस थांबविणें किती अगत्याचें आहे हें सहज लक्षांत येईल. भात सडण्याच्या अशास्त्रीय पद्धतीमुळें तांदुळाच्या गिरण्यांतील उतारा ६० टक्केच पडतो. जपान व अमेरिकेसारख्या प्रगत देशांतील भातसडीच्या गिरण्यांतील उतारा ७० टक्क्यांपेक्षाहि अधिक आहे.

### हिंदी मालाला रशिआकडून वाढती मागणी

हिंदमध्यें तयार होणाऱ्या नित्योपयोगी वस्तूंना रशिआकडून मोठ्या प्रमाणावर मागणी येत आहे. ज्यूट, तयार कपडे, सतरंज्या, विजेचे दिवे इत्यादींची मागणी इतकी वाढली आहे कीं त्या वस्तूंचा पुरवठा करणें खाजगी उत्पादकांच्या आवाक्याबाहेर गेलेलें आहे. त्यामुळें ह्या वस्तु तयार करण्यासाठी सार्वजनिक मालकीच्या विभागांत नवे कारखाने काढण्याची गरज उत्पन्न झाली आहे. हिंदचें एक व्यापारी मंडळ उभयता देशांतील व्यापारी देवघेव दुप्पट करण्याच्या प्रश्नाची चर्चा करण्यासाठी रशिआंत गेलें आहे. उभयता देशांच्या प्रतिनिधींनीं रशिआला लागणाऱ्या नित्योपयोगी वस्तूंची यादी तयार केलेली आहे. भारतामधील अनेक प्रकारच्या वस्तु राशिआंत मोठ्या प्रमाणावर खपण्यासारख्या आहेत. मात्र त्यांचा दर्जा उत्तम राखण्याची गरज आहे.

### कंपन्यांच्या जाहिरात खर्चावर मर्यादा

लिमिटेड कंपन्यांच्या जाहिरात खर्चावर मर्यादा घालणारे नियम तयार केले असून, त्यांवरील मतप्रदर्शन लक्षांत घेऊन ते पक्के केले जातील; त्याचप्रमाणें रेडिओ सिलोनवर जाहिराती देण्याची यांची प्रवृत्तीहि कमी करण्यासाठी उपाय योजना केली जात आहे, असें अर्थमंत्र्यांनीं लोकसभेंत सांगितलें.

### प्राप्तिकराची थकबाकी

प्राप्तिकराची थकबाकी ३१ मार्च, १९६४ रोजीं २७७.५६ कोटी रुपये होती, ती ३१ मार्च, १९६५ रोजीं ८६.३० कोटी रुपयांनीं कमी झाली.

### "कर्जांचें रेशनिंग करा"

बँकांनीं कर्जें देतांना रेशनिंगच्या पद्धतीचा अवलंब करावा, असें नियोजनमंत्री श्री. बी. आर. भगत ह्यांनीं कॅनरा बँकेच्या दिल्ली येथील एका शाखेच्या उदघाटन प्रसंगीं सांगितलें.


वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.

स्थापना : १९४१ ] मुगभाट, मुंबई-४. [ टेलिफोन ७२१००

बचतीच्या आकर्षक योजना

( १ ) स्पेशल सेव्हिंग व्याजाचा दर ३॥ टक्के
( २ ) त्रैवार्षिक मासिक बचत " ३॥ "
( ३ ) पंचवार्षिक बचत सर्टिफिकिटें " ५ "

मुदतीच्या आकर्षक दरासंबंधीं चौकशी करा.

मॅनेजर—ना. शं. कानिटकर

सरदारगृह


मुंबईंत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.
मंगलकार्यें व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.

— आमचीं वैशिष्ट्यें —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत् पद्धतीचें भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोयी.
* टिळक जन्म-शताब्दीदिनीं लोकमान्यांचें सरदारगृहांत केलेलें स्मारक.

फोन नं. :-३८३३७ ] सरदारगृह प्रा. लि. [ तार-सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

महाराष्ट्र सरकारनें
तगाईवर मंजूर केलेले
"विजय" नांगर
वापरा. ४, ६ व ८ बैली
फाळ व सुटे भाग




तसेंच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्




१" ते ४" बेल्ट ड्राइव्ह व डायरेक्टर कपल्ड, शिवाय

बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट इ. इ.

— न्यू विजय इंडस्ट्रीज लि. —
विश्रामबाग – सांगली ( महाराष्ट्र )

दातांच्या स्वच्छतेसाठी

★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनीं छापिलें व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४, येथें प्रसिद्ध केलें.